# प्रकरण दुसरे

## संशोधन साहित्याचा आढावा

१९७५ च्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षानंतर जगभरात स्त्री अभ्यास या विषयीची वेगाने वाढ होऊ लागली. महिला वर्षानंतर जगभरात आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर होऊ लागलेल्या प्रयत्नांमुळे स्त्रियांच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन मिळाले. स्त्रियांसाठी राखीव जागांमुळे केवळ मतदार म्हणूनच नव्हे तर निर्वाचित प्रतिनिधी म्हणूनही स्त्रियांचे प्रमाण वाढू लागले. त्यामुळे पूर्वी केवळ 'मताधिकाराची चळवळ', 'स्त्री मतदारांचे मतदान करण्याचे निकष आणि प्रमाण' अशा गोष्टींभोवती फिरणारे संशोधन अधिक प्रगल्भ बनत नव्याने उद्‌भवणा-या अनेक विषयांचा वेध घेऊ लागले आहे.

जगभराबरोबरच भारतातही स्त्रियांविषयीच्या विविध पैलूंवर, विशेषतः सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक बाबींवर प्रकाश टाकणारे बरेचसे लेखन सध्या उपलब्ध आहे. या प्रकरणामध्ये स्त्रियांवरील झालेल्या संशोधन साहित्यातील काही संदर्भ ग्रंथाचा आढावा येथे घेण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर Western Political Quarterly, Journal of Politics, Politics and Gender, Women and Politics, Economic and Political Weekly अशा अनेक नियतकालिकामधून राजकारणातील स्त्रियांबद्दलचे संशोधन मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाले आहे.

### परदेशातील अभ्यास :

कॅलिफोर्नियातील पक्षनेत्यांच्या अभ्यासात Edmund Constantini आणि Kenneth Craik यांनी राजकारणी स्त्रिया पक्षसंघटनेतील जबाबदा-यांच्या अनुषंगाने आपली राजकीय कारकीर्द घडविण्यावर भर देतात, तर राजकारणी पुरुष एखादे सार्वजनिक पद मिळविण्यावर भर देतात असा निष्कर्ष काढला आहे. स्त्री म्हणून येणारे अडथळे पार करण्यासाठी राजकारणी स्त्रीकडे राजकारणी पुरुषापेक्षा अधिक संसाधने असणे गरजेचे आहे, असे त्यांनी मांडले आहे.(१) Hazel Erskine यांना जनसामान्यांचा राजकारणी स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन, त्या राजकारणात पुरुषांपेक्षा कमी सक्षम

असतात असा असल्याचे मांडले आहे.(२) याच्या अगदी उलट प्रतिपादन Susan Welch आणि Dorithy Studler यांनी १९७९ च्या Susan Welch यांच्या अभ्यासाच्या आधारे नोंदविले आहे. त्यांच्या मते बहुतेक ब्रिटीश नागरिकांना, त्यांचे निर्वाचित प्रतिनिधी स्त्री आहेत की पुरुष याने काहीच फरक पडत नाही.(३)

Bochel आणि Denver यांच्या मते स्त्रियांना कमी उमेदवारी मिळाल्याचे कारण निवडणूक मंडळाच्या स्त्री-विरोधी दृष्टीकोन हे आहेत.(४) Eckstrandआणि Eckert यांनीही मतदारांमध्ये स्त्रियांना मत देण्याची तयारी असल्याचे आढळले आहे. (५)

Wilma Rule यांनी मात्र निवडणूक मंडळाचा एक मोठाच अडथळा उमेदवारी मिळवण्यासाठी पार करणे स्त्रिला अवघड जात असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे.(६) Sarah Schramm यांनी स्त्रियांना राजकारणात अल्पसंख्याकांचा दर्जा असतो आणि राजकारणात यशस्वी होणा-या स्त्रिया सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणे नाहीत तर अपवादात्मक आहेत असे मत मानले जात असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे.(७) १९८१ मध्ये केलेल्या अभ्यासात Susan Caroll यांनी राजकारणी स्त्रियांबद्दलच्या प्रचलित कल्पनांना धक्का देणारे निष्कर्ष काढत, स्त्रियाही पुरुषामइतक्याच महत्वकांक्षी असतात असे निरीक्षण नोंदविले आहे.(८) Paula Debeck यांनी स्त्री व पुरुष लोकप्रतिनिधींच्या तौलनिक अभ्यासानंतर स्त्रिया राजकारणात सहभागी व्हायला उत्सुक नसतात हा समज खोडून काढला आहे. निवडणूक प्रचारात तळागाळात केली जाणारी सर्व कामे मुख्यत्वे स्त्रियाच करतात याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. मात्र अधिकाधिक वरच्या जागांवर निवडून जाण्यासाठी राजकारणी पुरुषाला जेवढ्या पात्रता पुरेशा ठरतात, त्यापेक्षा जास्त पात्रता आणि क्षमता स्त्रीने सिद्ध केली असेल तरच तिला त्याजागी पोहोचणे शक्य होते असा त्यांचा निष्कर्ष आहे.(९)

## भारतातील अभ्यास

भारतातही स्त्रियांच्या राजकीय सहभागाबद्दल संशोधकाद्वारे तसेच विविध शासकीय सामित्यांच्या अहवालाद्वारे भरपूर संशोधन साहित्य निर्माण झाले आहे. 'Towards Equality' या अहवालात फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखालील Natinal Committee on the Status of Women ने स्थानिक स्तरावर स्त्रियांसाठी राजकीय आरक्षणाची शिफारस केली होती.(१०) National Perpestive Plan for Women (१९८८-२०००)

या योजनेतही स्त्रियांच्या राजकीय सहभागाबद्दल एका स्वतंत्र प्रकरणाचा समावेश असून मतदार, उमेदवार, निर्वाचित प्रतिनिधी अशा सर्वच भूमिकांमध्ये स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा आढावा घेण्यात आला आहे. या योजनेतही स्थानिक स्तरावर स्त्रियांसाठी ३०% आरक्षणाची शिफारस करण्यात आली होती. केवळ सदस्यांमध्येच नव्हे तर पदाधिका-यांमध्येही आरक्षण असावे अशी शिफारस करुन योजनेने एक पाऊल पुढे टाकले आहे.(११)

सुमा चिटणीस यांनी तिस-या जगातील स्त्री-पुरुषांमधील विषमता विकसित राष्ट्रातील विषमतेपेक्षा अधिक गंभीर असल्याचे मत मांडले आहे.(१२) रगी छाब्रा आणि अलका बसू यांनी भारतात स्त्रियांना मिळालेली घटनादत्त समानता आणि प्रत्यक्षात त्यामानाने मिळणारी राजकीय सत्ता यांच्यातील दरीचे वर्णन केले आहे.(१३) रीटा मनचंदा यांनी संसदेत आलेल्या स्त्रियांपैकी ब-याचजणी 'आपल्या पुरुष नातलगांमुळेच आल्या आहेत' असे निरीक्षण नोंदविले आहे.(१४) वीणा मुजुमदार यांनी केवळ पुरुषांच्या संदर्भात स्त्रियांच्या भूमिकेचे मूल्यमापन न करता त्यांचे स्वतःच्या आयुष्यावर किती नियंत्रण आहे, त्यांना विविध संसाधने किती प्रमाणात उपलब्ध आहेत आणि एखादे पद मिळाल्यावर त्या किती प्रभावी ठरतात यांचाही विचार होण्याची आवश्यकता प्रतिपादित केली आहे.(१५)

इंदिरा अवस्थी यांनी आपल्या संशोधनात, स्त्रियांनी पुरुषी वर्चस्वाखली जे निष्कर्ष काढले, त्यामध्ये पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे की, 'एकूण मुलाखत घेतलेल्या ४५ महिलांपैकी केवळ २६ जणींनी पुरुषांचेच वर्चस्व मान्य केले, तर १४ जणींनी महिला उमेदवारास मत देण्याचे अमान्य केले आहे. याशिवाय ५ महिलांनी माझा निर्णय, मीच घेणार असे सांगितले.(१६) Elite Women in Indian Politics या आपल्या अभ्यासात विजय ॲग्न्यु यांनी भारतीय राजकारणात स्त्रियांच्या अभ्यासाचा एक विस्तृत पटल उलगडला आहे. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी स्त्रिया आणि स्वातंत्र्योत्तर काळात लोकप्रतिनिधी बनलेल्या स्त्रिया, राजकारणी पुरुषांशी स्पर्धेच्या भावनेतून नव्हे तर सहकार्याच्या भावनेतून काम करत असत, असे म्हटले आहे.(१७)

## महाराष्ट्रातील अभ्यास

चंद्रकला हाटे यांच्या असे निदर्शनास आले की, महिलांचा राजकारणातील प्रवेश हा अप्रत्यक्षच राहतो आणि त्यांची राजकारणाविषयीची आवडच कमी असते.(१८) पी. एन. लिमये यांच्यामते मध्यमवर्गीय महिलांचा राजकारणातील प्रवेश हा जास्त दिसून येतो व त्यांना शिक्षण हा घटक अडथळा ठरत नाही.(१९) एस.एन.तावले यांना असे दिसून आले की महाराष्ट्रातील महिलांचा राजकारण सहभागाचे चित्र हे उच्चजात व वरच्या वर्गातील समाजात वेगवेगळे दिसून आले आहे.(२०)

उषा बंबावले यांच्या, 'Women and Politics' या पीएच.डी. प्रबंधामध्ये स्त्रियांचा सामाजिक आर्थिक, राजकीय कौटुंबिक व सांस्कृतिक दर्जा व भूमिका याबाबत दिसून आले आहे की पक्ष किंवा पक्षातील मित्रमंडळी त्यांना राजकारणात आणण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांनी पुढे असे म्हटले आहे, की स्त्रीने राजकीय परिपक्वता धारण केली पाहीजे, ज्यामुळे ती स्वतंत्र व्यक्ती म्हणून राजकीय पदांचा कार्यभार जबाबदारीने पार पाडू शकेल तसेच लोकशाही राज्यपद्धतीत स्वतंत्र व्यक्ती म्हणून सर्व जबाबदा-या व्यवस्थित पार पाडू शकेल.(२१)

व्ही.एम.सिरसिकर यांनी पुणे भागातील राजकीय कार्यकर्त्यांच्या कार्याचा अभ्यास केला, त्यामध्ये त्यांना असे आढळून आले की, महिला कार्यकर्त्या ह्या पक्षाने दिलेल्या कोणत्याही कामास तयार असत. व त्याबद्दल त्यांना इतर पुरूष सहका-यांच्या तुलनेने कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटत नव्हता.(२२)

व्ही. के. बोरे यांनी महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील पुणे जिल्ह्याचा अभ्यास केला. ज्यामध्ये १८५७ -१९५७ पर्यंत पुण्यातील महानगरपालिकेमध्ये फक्त ७ स्त्रियांनाच प्रतिनिधी म्हणून संधी मिळाली, पण यातील एकाही महिलेला विशेष अधिकारांचे पद मिळाले नाही, असे त्यांनी नमूद केले आहे. पूढे त्यांनी असेही म्हटले आहे की, अनेक सामाजिक बंधने, आर्थिक बाबी यामुळे स्त्रियांना राजकारणात प्रवेश करण्यास अडथळे येत होते, (२३). विजय देव यांनी महिलांच्या राजकीय सहभागाच्या अभ्यासात खालील वैशिष्ट्ये सांगितली आहेत. १) महिलांचा राजकारणातील प्रवेश हा, कमीच नाही तर पुरूषांच्या तुलनेत कमी दर्जाचा दिसून आला. २) स्वातंत्र्यपूर्वकाळात ज्या महिलांनी राजकारणात काम

केले त्या उच्चभ्रु वर्गातील होत्या. ३) राजकारणातील महिलांची कामे मुख्यत: पुरूषच करत असताना आढळून आले. मुख्य निर्णय पुरूषच घेत होते. तर महिला फक्त रबरी शिक्क्याप्रमाणे काम बजावत होत्या.(२४) एन्. आर. इनामदार यांच्या असे निदर्शनास आले की, १९ व्या शतकात महिलांचा राजकीय सहभाग जरी आढळला तरी २० व्या शतकाचा पाया या काळात मजबूत होण्यास मदत झाली. ज्यामध्ये बालविवाहबंदी, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण या चळवळींना चालना मिळाली.(२५)

रोहिणी गवाणकरांनी आपल्या मराठी 'स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप' या पुस्तकात राजकीय पक्षाचे कार्य स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, ' आज स्त्रिया अनेक क्षेत्रात पुरूषांच्या जोडीचे कार्य करताना दिसतात. परंतु त्यांचा सामजिक, आर्थिक, शैक्षणिक दर्जा वरचा असून त्या उच्चवर्गीय असतात. ही वस्तुस्थिती नजरेआड होऊ शकत नाही पण म्हणून त्या सर्वसामान्य भारतीय स्त्रीचे प्रतिनिधीत्व करतात असे मानणे धाडसाचे होईल. कारण या मूठभर उच्चवर्गीय व सुशिक्षित स्त्रियांची, खेड्यातून राहणा-या स्त्रियांशी बरोबरी होऊ शकत नाही.(२६)

उर्मिला पाटील यांनी आपल्या एम.फिल. च्या प्रबंधामध्ये स्त्रियांच्या राजकीय सहभागाबाबत पुढीलप्रमाणे मत मांडले आहे. भारतीय घटनेने स्त्रियांना मतदानाचा अधिकार देऊन आता ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालखंडात स्त्रियांचा मतदानाद्वारे राजकीय सहभाग सातत्याने वाढत गेला, पण तो एकसारख्या प्रमाणात वाढला नाही. त्यांनी आपल्या प्रबंधात पूढे असेही म्हटले आहे की, स्त्रियांचा हा निवडणुकीतील सहभाग प्रत्येक राजकीय पक्षाच्या अंतर्गत पातळीवर, स्त्रियांच्या सहभागाविषयी त्या पक्षाला कितपत जाणीव आहे, यावर अवलंबून असतो. म्हणजेच कोणत्याही पक्षाकडून स्त्रियांमध्ये मुद्दाम जागृती किंवा जाणीव निर्माण करण्याचे प्रयत्न झाले नाहीत, याची कारणे सांगताना उर्मिला पाटलांनी पुढे असे म्हटले आहे की, स्त्रियांचा राजकीय सहभाग कमी असण्याची कारणे नेहमीच स्त्रियांचे राजकारणात सहभागी होण्यास उत्सुक नाहीत किंवा स्त्रियांना राजकारणाविषयी ब-याच विषयांसंदर्भात माहिती नसेल किंवा स्त्रियांना एका संघटित दबावगट किंवा हितसंबंधी गट मानलेच जात नाही. तसेच अल्प स्त्री-प्रतिनिधीत्व प्रमाणामागील कारणे शोधताना साक्षरता, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन व रोजगार, नोकरशाही व सामाजिक स्थिती या घटकांचाही परिणाम होतो.(२७)

रेहाना घडियाली यांनी संपादित केलेल्या 'समकालीन भारतातील नागरी स्त्रिया' या पुस्तकातील लेखात लीला कस्तुरी यांनी स्त्रियांच्या राजकीय सहभागाबद्दल पुढील मत व्यक्त केले आहे. स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्याबाबतीत भेदभावाचे प्रकार दिसून येतात. यामध्ये उमेदवार म्हणून स्त्रिया निवडून आल्या तरी निर्णयक्षम संस्थामध्ये स्त्रियांना वगळले जाते, त्यामुळे मतदार म्हणून स्त्रियांची संख्या पुरुषांइतकीच असली तरी राष्ट्रीय आणि राज्यविधिमंडळाच्या सत्ता स्थानांवर आणि निर्णय घेणा-यांमध्ये त्यांची संख्या ८% किंवा त्यापेक्षाही कमी आहे. लीला कस्तुरी यांनी पुढे असेही म्हंटले आहे की सर्वच राजकीय पक्ष त्यांना पुढे न येऊ देण्यास जबाबदार आहेत. ज्या काठी थोड्या स्त्रिया संसदेमध्ये पोहोचल्या आहेत, त्यांनाही त्यांच्या पक्षांच्या आदेशाप्रमाणे स्त्रियांच्या समस्यांबाबत झुकविण्यात येते किंवा अडथळे आणले जातात.(२८)

मेधा नानिवडेकर यांनी 'महिलांचा सत्तासहभाग' (राखीव जागा धोरणाची फलश्रुती) हा अहवाल स्थानिक स्वराज्य संस्थात विशेषतः महानगरपालिकेमध्ये स्त्रियांना ७३ च्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने ३३% आरक्षण मिळाल्यानंतर त्यांची काम करण्याची पध्दत, राखीव जागा धोरणामुळे त्यांना मिळालेला फायद व त्यांचे आजवरचे अनुभव यांचा अभ्यास करुन तयार केला आहे. या अहवालात मेधा नानिवडेकरांनी स्त्रियांना आरक्षण मिळाल्यानंतरचा स्त्री-पुरुषांच्या कार्यामधील फरक, आरक्षणाचा स्त्री व पुरुष उमेदवारांवर झ ालेला परिणाम, आरक्षण मिळाल्यामुळे महिलांना कोणता फायदा झाला, त्यांच्यात स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठीचा स्त्रियांचा असा खास दृष्टीकोन कितपत विकसित झाला आहे इ. मुद्द्यांचा अभ्यास केला आहे. त्यांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत.

१. कार्यकर्त्या स्त्री नगरसेवकांपेक्षा कागदी नगरसेविकांचे प्रमाण आज जास्त असले तरी, जर आरक्षण नसते तर या कार्यकर्त्या नगरसेविकांचा महानगरपालिकेत प्रवेश होणे अवघड होतो किंवा अशक्य होतो. तर कागदी नगरसेविकांनी पुढे प्रभाग खुला झाल्यानंतर तो जवळच्या पुरुष नातलगाकडे परत करण्याचे मनोगत व्यक्त केले होते.
२. नगरसेविका म्हणून निवडून येण्याआधी काही महिला पक्षकार्यात सक्रिय असल्या तरीही राजकीय गळतीचे तत्त्व त्यांनाही लागू पडण्याची शक्यता आहे.

३. या आरक्षणामुळे वंचित वर्गातील महिलांनाही निवडून येण्याची संधी मिळाली आहे.

४. राजकीय पक्षसंघटनेत महिलांना उत्तेजन दिल्यास त्यांचा राजकीय सहभाग वाढेल व त्या आपली जबाबदारी अधिक समर्थपणे निभावू शकतील, अशा प्रयत्नांमुळे योग्य महिला उमेदवारांची संख्या वाढेल.

५. राखीव जागा धोरणामुळे महिलांच्या मनात राजकीय महत्वकांक्षा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे राजकीय शिडीवरुन अजून वरच्या पदावर जाण्यासाठी त्यांना सध्याच्या अनुभवाचा फायदा होऊ शकेल.

६. महिलांचा सर्वाधिक सहभाग महिला व बालकल्याण अशा समित्यांमध्येच दिसतो. अर्थ, स्थायी यासारख्या समित्यांमध्ये फारच थोड्या स्त्रिया दिसतात.

७. स्त्री व पुरुष नगरसेवकांचा अनुक्रमामध्ये तसेच काम करण्याच्या पध्दतीमध्ये फारसा फरक आढळत नाही. महिलाही पुरुषाप्रमाणेच विचार करतात असे वाटते, कारण त्यांचेही प्राधान्य देण्याचे विषय पुरुषांप्रमाणेच असतात. (२९)

वासंती रासम यांनी आपल्या 'Political Participation of Women Corporaters in Civil Affairs with Special References of Kolhapur Municipal Corporation' या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये ३०% आरक्षणामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला आहे, स्त्रियांच्या सहभागामुळे भ्रष्टाचारासारख्या घटनांना आळा बसला, उच्चवर्गीय व उच्चवर्णीय स्त्रियांबरोबरच मध्यमवर्गीय व इतर दुर्लक्षित महिलांच्या कारभारात सहभाग वाढला, पण त्यांचा सहभाग वाढला असला, तरी त्यांचे सत्तेतील स्थानामध्ये बदल झालेला नाही, असे नमूद केले आहे. (३०)

अर्चना कांबळे यांनी आपल्या Women Leadership in Panchayat Raj A Sociological Study या प्रबंधामध्ये स्त्रियांचा औपचारिक सहभाग हा एक क्रांतिकारी टप्पा असून जे सामाजिक, आर्थिक व राजकीय घटक स्त्रियांच्या पंचायत संस्थेतील प्रवेशास कारणीभूत ठरले त्या घटकांवर किंवा दूस-या शब्दात स्त्रियांच्या राजकिय सबलीकरणास अनुकूल घटकांवर प्रकाश टाकतो. तसेच हा अभ्यास स्त्रियांच्या आरक्षणाचे धोरण व स्त्रियांची पंचायत राजसंस्थेतील भूमिका व समकालीन राजकीय परिस्थिती आणि स्त्रियांचा राजकारणातील प्रवेश व सहभाग याविषयीसुध्दा आहे. (३१)

तुकाराम पाटील यांनी आपल्या एम.फिल. प्रबंधामध्ये स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यांचा आढावा घेतला आहे. तसेच ३३% जागा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव मिळाल्याने या संस्थामध्ये सहभागी होणा-या स्त्रियांच्यामुळे झालेले बदल पुढे नमूद केले आहेत.

१. महिलांना नगरपालिकेच्या कारभारात काम करण्याची संधी मिळाली.

२. महिलांच्या सदस्य संख्येत वाढ झाली.

३. उच्चवर्गीय, उच्चवर्णीय यांच्या बरोबर मध्यमवर्गीय, मागास व इतर मागास वर्गीय महिलांना राजकीय कारभारात सहभाग मिळाल्याने त्यांच्यात गुणात्मक व लक्षणीय बदल पडून आला.

४. महिलांच्या हजेरीमुळे नगरपालिका सदस्यांच्या गैरवर्तनाला आळा बसला.

५. विश्वास व कर्तव्यदक्षता यामुळे त्या समजाच्या विश्वासास पात्र ठरल्या (३२) .

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री-अभ्यास केंद्रातर्फे १०८ व्या घटनादुरुस्तीबाबत विधानसभा आणि लोकसभेतील महिला आरक्षणासंदर्भात संयुक्त संसदीय समितीपुढे देण्यात आलेल्या निवेदनात पुढील मुद्यांचा समावेश आहे. ओ.बी.सी. महिलांसाठी आरक्षण असावे किंवा नाही याचा योग्य निर्णय होण्यासाठी सध्या लोकसभेत किती ओ.बी.सी. स्त्री-पुरुष सदस्य आहेत यांची अधिकृत आकडेवारी लोकसभा सचिवालयाने जाहीर करावी. लोकसभा मतदारसंध महिलांसाठी आरक्षित झाल्यास १८१ पुरुष खासदार लोकसभेबाहेर फेकले जातील, ही परिस्थिती स्त्री पुरुषांमध्ये संघर्ष उत्पन्न करणारी आहे. त्यामुळेच महिला आरक्षण विधेयक बारा वर्षे प्रलंबित राहिले आहे. स्त्री-पुरुषांच्या हिताचे रक्षण करणे तसेच त्यांच्यातील परस्पर सामंजस्य टिकविणे या दृष्टीने खासदारांची संख्या वाढवून स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्यात यावे व त्यासाठी आवश्यक तर द्विसदस्य मतदारसंघाचा पर्याय विचारात घ्यावा असे सुचविण्यात आले आहे (३३) .

रंजना कुमारी यांनी आपल्या Participation of Women in Panchayats Challengs of Emerging Leadership या संशोधनपर निबंधात अनेक बाबींचा उल्लेख केला आहे. ज्यामध्ये पुढील प्रश्नांचा उहापोह केला आहे.

१) पंचायत राज मधील महिलांनी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रभाव पाडला आहे का? व महिलांचे एकूण राजकीय आणि सामाजिक सबलीकरण झाले आहे का?

२) महिलांचा राजकारणातील प्रवेश झाल्यामुळे समाजाच्या दृष्टिकोनात काही बदल होतो का?

३) महिलांच्या सबलीकरणासाठी समाजाने त्यांना कोणती व कशा प्रकारे मदत करावी?

४) राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांना स्थानिक महिला कसे तोंड देतात? रंजना कुमारी यांनी आपल्या या पेपर मध्ये इतरही काही गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये लोकशाही आणि प्रशासन, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, निर्णय क्षमता प्रसिद्ध महिलांच्या राजकारणातील सहभागावर परिणाम करणारे घटक यांचा समावेश होतो.

५) पंचायत राजमधील लोकशाहीचे विकेंद्रीकरण.

६) प्रातिनिधिक लोकशाही आणि महिलांचा सहभाग.

७) पंचायत मधील महिलांच्या प्रतिनिधित्वाचा परिणाम.

८) दृष्टीकोनामधील बदल, समाजाचा प्रतिसाद, घरकामाची वाटणी, पंचायतीच्या कार्यामध्ये मिळणारे सहकार्य आणि राजकीय सहभागात मिळणारी पदोन्नतीची पद्धती.(३४)

Report from Bangalore यामध्ये अविनाश सामंत यांनी २४ एप्रिल २००६ च्या एक दिवसाच्या परिसंवादामध्ये महिलांच्या दाक्षिणात्य राज्यातील सहभागावर प्रकाश टाकला आहे. यामध्ये एस. सी., एस. टी., ओ. बी. सी. मधील जे आरक्षण आहे त्यावर प्रकाश टाकला आहे. या परिसंवादामध्ये ललिता यांनी ग्रामपंचायतीमधील आपल्या सहभागाचे अनुभव सांगितले आहे. याच संवादामध्ये नारायण स्वामी यांनी आपले मत व्यक्त करताना स्वशासनात प्रत्येक स्तरावर प्रशिक्षणाची आवश्यकता सांगितली आहे. नारायण स्वामी पुढे असे म्हणतात की, सरकार व खाजगी संस्था यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी मदत करावी.(३५)

Women & Gram Sabha Experiencs in Kerala आपल्या पेपर मध्ये मेरी सेबस्टिन यानी केरळ मधील स्त्रियांचा राजकीय ,सामाजिक आणि आर्थिक प्रश्नाबाबत चर्चा केली आहे. ज्या मध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, राज्यसंस्थेत सहभागी झालेल्या महिला ह्या दारिद्र्यरेषेखालील घरातून आलेल्या आहेत. केरळमध्ये प्रत्येक वार्डामध्ये ग्रामसभा आहे. १०० पैकी १० टक्के मतदार कोरम पूर्ण करतात. ग्रामसभेची वर्षातून चार वेळा मिटिंग घेतली जाते. ज्या मध्ये कामाचे नियोजन कार्य पध्दती यावर सविस्तर चर्चा केली जावून

वार्षिक आरखडा तयार केला जातो. १/३ सदस्य महिला सर्वकष विकास कामामध्ये चांगली भूमिका बजावू शकतात. महिलांच्या या सहभागामध्ये केरळ मधील सहायता गट भरपूर स्थापन केले आहेत. हे गट अनौपचारिक असून यामध्ये दारिद्र्य रेषेखालील महिलांचा सहभाग दिसून येतो. ग्रामसभांना नाबार्ड तर्फे आर्थिक मदत केली जाते (३६)

तामिळनाडू राज्यातील महिलांचा ग्रामसभेतील सहभाग मधुश्री शेखर यांनी आपल्या शोधनिबंधात तामिळनाडूमधील विविध कायद्यांमधून पंचायतराज्यामधील महिलांच्या सहभागाचा वेध घेतला आहे. (३७) महिलांच्या ग्रामसभेतील सहभागाबद्दल तामिळनाडू हे राज्य दक्षिणेतील इतर राज्याच्या (कर्नाटक, आंध्रप्रदेश) यांच्या पुढे असल्याचे म्हटले आहे.

देवेंद्र बाबू- यांनी आंध्रमधील विकेंद्रीकरण प्रक्रियेचा प्रयत्न पंचायत राज संस्थेतील महिलांचा गट, महिलांचा ग्रामसभेतील सहभाग, ग्रामसभेचे कार्य चांगले न होण्यामागील घटकांचा आढावा घेतला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, महिला ग्रामसभेला उपस्थित राहत नाहीत. याला कारण म्हणजे पांरपारिक चाली, रीती-रिवाज, शकून अपशकुन हे आहेत कारण पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांना चूल व मूल हेच आपले कार्य क्षेत्र आहे असे मानतात. आंध्रातील सरपंच प्रत्यक्ष मतदारांकडून निवडला जातो यामधील गावातील राजकारणात प्रसिध्द असणारी व्यक्तीच निवडली जाते. ज्यावर सर्व गावकऱ्यांचा विश्वास असतो कारण तोच गावातील कारभार पाहताना मुख्य आणि शक्तीशाली अधिकारी असतो. आंध्रातील मुख्य प्रदेशातील राजकारण हे खुण, मारामाऱ्या यामुळे कलंकित झाले आहे. त्यामुळे सर्व साधारण पणे पुरुष व महिला मिटींगला हजर राहत नाहीत.(३८)

वरील सर्व संशोधन साहित्याचा आढावा घेतल्यानंतर आजपर्यंतच्या अभ्यासात स्त्री - पुरुष सदस्यांचा तुलनात्मक अभ्यास अजूनही मोठ्या प्रमाणात झाला नसल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष सदस्यांचा तुलनात्मक अभ्यास नगरपालिका स्तरावर होणे गरजेचे आहे. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री-पुरूष सदस्यांचा तौलनिक अभ्यास या माझ्या विषयाचे महत्व अधोरेखित होते.

# संदर्भ

1. Constantini, E. and Craik, K. (1972)." Women as Politicians", Journal of Social Issues, Vol. 28, pp.217-236.

2. Erskine, H. (1971). "The Polls: Women's Roles", Public Opinion Quarterly, Vol. 35.

3. Welch, S. and Studler, D.T. (1986). "British Public Opinion Toward Women in Politics", Western Political Quaretrly, Vol.39, pp. 138-154.

4. Bochel , J. and Denver , D. (1983). " What Selecters Seek?" , British Journal Of Political Science, Vol. 13, pp. 45-69

5. Eckstrand, L. E. and Eckert, W.A. (1981). " Impact of candidate's sex on voter's choice", Western political Quarterly, Vol. 34. pp. 78-87.

6. Rule, W. (1981). " Why women don't run?" , Western Political Quarterly, Vol. 34, pp. 46-59.

7. Schramm, S. S. (1981). " Women and representation", western Political Quarterly, Vol. 34, pp. 60-70.

8. Carrol, S. J. (1985). " Political elites and sex differene in political ambition", Journal of Politics, Vol. 41. pp. 1231-1243.

9. Dubeck, P. J. (1976). " Women and access to political office" , Sociological Quarterly, Vol. 17. , pp. 42-52.

10. The report of the National Committee on the status of women in India." (1975). I.C.S.S.R., Allied Publishers, Delhi.

11. The National Perspective Plan for women, 1988-2000 AD. p. 158

12. Chitnis, S. (1980). Introduction, "Women in Third World", Ed. Leeqe Fulehally. Lesley Sawhney, Bombay. P.3.

13. Chhabra, R. and Basu A. 91980 "Women in India" in "Women in the Third World", Ed. L. Fulehally. P. 47.

14. Manchanda, Rita. (1988). "Women in Parliament" Manushi, No. 47 July- Aug, 1988.

15. Mazumdar, Veena. (1976) "Towards equality", in "Women of the world" Ed. Phadnis, U. and Malani, I.

16. Awasthi, Indira. (1982). "Rural women of India", B.R. Publishing Corporation, Delhi. Pp. 319-320.

17. Agnew, V. (1975). "Elite Women in Indian Politics", Delhi, Vikas Publications.

18. हाटे सी (१९८५) "स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री " महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळ .

19. Limaye, P.N. (1979). "Politicization of women in Maharashtra". In "Symbols of power Ed. Veena Mazumdar. Tawale, S.N. (1979). Profiles of women in Maharashtra" In "Symbols of Power" Ed. Veena Mazumdar.

20. Tawale, S.N. (1979). "Profiles of women in Maharashtra", In, "Symbols of power" Ed. Veena Mazumdar. I.C.S.S.R.

21. Bambawale, U. (1982). "Women and Politics", (Unpublished).

22. Sirsikar, V.M. (1961). "A Study of political workers in Poona" Journal of University of Poona, Vol. 4, pp. 77-159.

23. क्षीरे व्ही. के. (१९८९) "पुण्याच्या स्थानिक स्वराज्य शासनात स्त्रियांचा सहभाग स्त्रीजीवन स्थित्यंतर", पुणे परिसर , इतिहास संकलन समिती पुणे (१९८९) पृ. २२६-२३०

24. देव विजय, (१९८९) "राजकीय दृष्ट्या पुणे परिसरातील स्त्रीजीवन" २०२ - २०९

25. इनामदार एन.आर. १९८९ , "पुण्यातील स्त्रियांची राजकीय जागृती व तिचा सामाजिक जागृतीशी संबंध"-" स्त्री जीवन "....... पृ. १९४-१९९

26. गवाणकर रोहिणी - मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप - प्रकाशक - आदित्य प्रकाशन, १९८६, पृ. ४२

२७. उर्मिला पाटील १९९८ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधित्व -एम. फिल प्रबंध पृ. ४

२८. कस्तुरी लिला - समकालीन भारतातील नागरी स्त्रिया - संपादन - रेहाना घडियाली - प्रकाशन - डायमंड पब्लिकेशन , २००८

29. मेधा नानिवडेकरांनी,१९९७-१९९८'महिलांचा सत्तेतील सहभाग' राखीव जागा धोरणाची फलश्रुती अहवाल.

30. Vasanti Rasam-,1991-Project Report-Political Participation of Woman Corporaters in Civic Affairs, with special reference of Kolhapur.

31. Archana Kambale -Women leadership in panchayat raj A sociological study-M.Phil Thesis,2000- Pp,16-40.
Archana Kamble

32. तुकाराम पाटील नगरपालिकेच्या कारभारातील नगरसेविकांचा राजकीय अभ्यास विशेष अभ्यास मुरगुड नगरपालिका एम. फिल प्रबंध इ १९९४

33. Shivaji University Memorandum Submitted to the Parlamentary Committee on Low and Justice 28-06-2008,Mumbai.

34.Kumari Ranjana(2000). "Participation of Women in Panchayats" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

35. Samal Avinash(2000). "Report from Bangalore" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

36.Mery Sebastin (2000). "Women and Gram Sabha Experiences from Kerala" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

37. Sekhar Madhushree (2000). "Women Participation in Gram Sabhas (Tamil Nadu)" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

38. M. Devendra Babu (2000). " Women Participation in Gram Sabhas (Andhra Pradesh)" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.